# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.12.2025** **वार- गुरूवार**

---

**सुतार**

ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांच्या पार्थिवावर आज उत्तरप्रदेशातील नोएडा इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राम सुतार यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. राम सुतार यांच्या कलाकृती भारताच्या इतिहासाची, संस्कृतीची आणि सामूहिक भावनेची शक्तिशाली अभिव्यक्ती आहेत आणि नेहमीच त्यांची कदर केली जाईल असं मोदी यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे.

महाराष्ट्र शासनाच्यावतीनं राजशिष्टाचार आणि पणन मंत्री जयकुमार रावल यांनी पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. तसंच केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही आदरांजली वाहिली.

जगातील सर्वात उंच पुतळा असलेल्या 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'चे शिल्पकार राम वंजी सुतार यांचं वृद्धापकाळाने नोएडा इथल्या निवासस्थानी निधन झालं. ते 101 वर्षांचे होते. श्रद्धांजली वाहताना रावल म्हणाले की, जागतिक कीर्तीचे महान शिल्पकार राम सुतार यांनी ‘स्टॅच्यू ऑफ युनिटी’सह अनेक ऐतिहासिक शिल्पांच्या माध्यमातून भारताची ओळख जागतिक पातळीवर नेली. त्यांच्या निधनानं कला क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. हुबेहूब आणि जिवंतपणा हे त्यांच्या कलेचं वैशिष्ट्य होतं. त्यांची शिल्पं ही त्यांच्या महान कार्याची नेहमी साक्ष देतील. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले की, महाराष्ट्राचे सुपुत्र राम सुतार यांचं शिल्पकला क्षेत्रात मोठं योगदान आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेक मान्यवरांचे पुतळे त्यांनी घडवले. त्यांनी दिल्लीमध्ये राहून महाराष्ट्राचा नावलौकिक वाढविला. त्यांच्या कलाकृती अजरामर राहतील असंही आठवले म्हणाले. कला, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह सुतार यांच्या चाहत्यांनी त्यांच्या पार्थिवाचं दर्शन घेतलं. यावेळी त्यांचे पुत्र अनिल सुतार यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. गेल्याच महिन्यात राम सुतार यांना 'महाराष्ट्र भूषण 2024' पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

**साखर**

देशात यंदा साखर उत्पादन वाढण्याची शक्यता लक्षात घेता साखरेचा किमान विक्री दर स्थिर राहण्यासाठी केंद्रानं साखर निर्यातीच्या कोट्यात आणखी वाढ करावी त्याचबरोबर आणखी पाच लाख टन साखर इथेनॉल निर्मितीकडं वळवावी, अशी मागणी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी केंद्र सरकारकडं केली आहे. यंदाच्या साखर हंगामात इथेनॉल निर्मितीसाठी सुमारे 35 लाख टन साखर वळविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर साखर उद्योगासाठी निश्चित केलेल्या इथेनॉल कोट्यात आणखी वाढ करण्याची आवश्यकता असल्याचं मत महासंघानं व्यक्त केलं आहे. सध्याचे साखर उत्पादन लक्षात घेता, आणखी पाच लाख टन साखर इथेनॉलकडे वळविल्यास साखर उद्योगाकडून इथेनॉलचा अतिरिक्त कोटा उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे इथेनॉल निर्मितीतील साखर उद्योगाचा सध्याचा टक्का वाढेल. या पार्श्वभूमीवर या मुद्द्यांकडं केंद्र सरकारनं सकारात्मक दृष्टिकोनातून पाहावं, अशी भूमिका महासंघानं मांडली आहे.

**देवराई**

पुणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील निसर्गदत्त वारसा असलेल्या देवरायांचं संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागानं पाऊल उचललं आहे. देवराई संरक्षण आणि संवर्धन योजनेअंतर्गत आंबेगाव, जुन्नर आणि खेड तालुक्यातील पाच गावांसाठी प्रत्येकी एक लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामुळं जैवविविधतेच्या जतनाला मोठी चालना मिळणार आहे. या योजनेसाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव अंतर्गत खेड तालुक्यातील खरपूड, आंबेगाव तालुक्यातील आहुपे, तिरपाड, राजपूर आणि जुन्नर तालुक्यातील अंजनावळे या गावांची निवड केली आहे. सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येणार असल्याचं प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी सांगितलं.

**पिंपरी चिंचवड गैरप्रकार**

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी महापालिका आणि पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्याद्वारे संयुक्तपणे आवश्यक बंदोबस्त करण्यात आला आहे. प्रचार फेऱ्या, सभा आणि अवाजवी खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी मुख्यालय आणि क्षेत्रीय स्तरावर व्हिडिओग्राफी गस्ती पथकं काम करतील. मतदारांवर प्रभाव टाकणं, प्रलोभन दाखवणं तसंच पैसे आणि मद्याची अवैध वाहतूक किंवा संशयास्पद हालचालींवर नजर ठेवण्यासाठी भरारी पथकं तैनात करण्यात आली आहेत. तसंच शहराच्या विविध नाक्यांवर शस्त्रास्त्रे आणि अवैध वस्तूंच्या वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी चेक पोस्ट पथकं कार्यरत राहणार आहेत. आचारसंहिता भंगाची कोणतीही तक्रार आल्यास त्यावर तातडीनं कार्यवाही करण्यासाठी महापालिका आणि प्रभाग स्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

**अल्ट्रा-मॅरेथॉन**

वेस्टर्न घाट रनिंग फाउंडेशनच्यावतीनं विविध 600 क्रीडा प्रकारांचा समावेश असणारी अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धा आज पार पडली. स्पर्धेत पुरुष गटात पालघरचा विशाल वाळवी तर महिला गटात कोलकत्ताची राखी रॉय विजेती ठरली. सिंहगडाच्या पायथ्यापासून सुरू होऊन राजगड, तोरणा आणि लिंगाणा किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत जाणाऱ्या या स्पर्धेत भारतासह विदेशातील जवळपास साडेनऊशे स्पर्धक सहभागी झाले होते. याशिवाय 11 किलोमीटर गटात पुरुषांमध्ये तनय कचरे तर महिला गटात सुरभी मेरुकर हे पुण्याचे स्पर्धक अव्वल आले. या अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये खडतर अशा मार्गांवरून सायकलिंग, धावणे, पोहणे, रॅपलिंग आणि गिर्यारोहण या साहसी क्रीडा प्रकारांचा समावेश होता.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**